# वार्षिक अहवाल २०१५-२०१६

(१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६)

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा इ. सन. २०१५-१६ सालचा वार्षिक अहवाल सादर करण्यास नियामक मंडळास अतिशय आनंद होत आहे.

## ◆ नियामक मंडळ सभा ◆

नियामक मंडळाच्या एकूण सहा सभा झाल्या. या सभांना मुंबई व मुंबईबाहेरील बहुसंख्य सभासद उपस्थित होते. (उपस्थिती पान क्र. ७) सभेत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

## ◆ कार्यकारी समिती सभा ◆

कार्यकारी समितीचे पदाधिकारी व सदस्य कार्यपरत्वे नाट्य परिषदेच्या कार्यालयात हजर राहून निरपेक्ष भावनेने परिषदेचा कार्यभार सांभाळीत आहेत. त्यामुळे नाट्य सृष्टीच्या सर्व घटकांचा परिषदेच्या कार्यालयाशी सातत्याने संपर्क साधला जात आहे. कार्यकारी समितीच्या एकूण अकरा सभा झाल्या. (उपस्थिती पान क्र. ६) १४ जून चा भव्य कलावंत मेळावा व पारितोषिक वितरण समारंभ, एकांकिका स्पर्धा, नाट्यसंमेलन हे परिषदेचे महत्वपूर्ण उपक्रम होत.

## ◆ वार्षिक सर्वसाधारण सभा ◆

परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ३१ जानेवारी २०१५ रोजी दुपारी २.०० वाजता परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी यांच्या अध्यक्षतेखाली अ. भा. मराठी नाट्य परिषद, यशवंतराव चव्हाण नाट्य संकुल, मनमाला टॅन्क रोड, माहिम, मुंबई ४०० ०१६ येथे घेण्यात आली.

## ◆ आजीव सभासद ◆

परिषदेची एकूण सभासद संख्या दि. ३१.०३.२०१६ अखेर २३६१६ झाली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| संस्था सभासद | १३ | उपकर्ते | ११ |
| आश्रयदाते | १० | हितचिंतक | ०७ |
| मध्यवर्ती आजीव सभासद | ४५६४ | सन्माननीय सभासद | ०८ |
| शाखा आजीव सभासद | १९००३ (शाखांची सदस्य संख्या पान क्र. ४ व ५ वर दर्शविल्याप्रमाणे आहे.) | | |

## ◆ आर्थिक मदत ◆

आवश्यकतेनुसार गरजू व वृध्द कलावंतांना नाट्य परिषद आर्थिक सहाय्य करीत असते.